**17 जुलै 2012**

## ‘मृणालताई, संघर्षाचे रोल मॉडेल’ - राम नाईक

**मुंबई, मंगळवार** : ‘‘जनसामान्यांच्या समस्यासाठी संघर्ष करणा-या राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मृणालताई ‘रोल मॉडेल’ होत्या. वेगळ्या राजकीय मतप्रणालींशी एकनिष्ठ असलेल्या मृणालताईंची व माझी कर्मभूमी एकच; गोरेगाव ! खरे तर राजकीय आखाड्याचे आम्ही प्रतिद्वंदीच. परंतु लोकसभा निवडणुकीतल्या उत्तर मुंबईतील त्यांच्या पराभवानंतरही मृणालताई कोणतीही कटूता न ठेवता स्नेहाने वागल्या. मी कर्करोगाने आजारी असताना प्रत्यक्ष येऊन विचारपूस केली; त्यांच्या 81 व्या वाढदिवसाचेही अगत्याने निमंत्रण पाठविले. राजकारणातला प्रतिद्वंदी केवळ वैचारिक पातळीवरचा; विरोधकांशी सन्मानाने वागून दर्जेदार राजकारणाचा कृतीतून वस्तूपाठ देणा-या मृणालताईंना श्रद्धांजली !’’, या शब्दात भाजपाचे नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी श्रद्धांजली वाहिली.

**(कार्यालय सचिव)**